मंत्रालयीन सेवा
सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास विभाग
३ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई -४०० ००१.
दूरध्वनी क्रमांक : (०२२) २२०६०१४४
**Website** : https://rdd.maharashtra.gov.in/ **Email** : soest3a.rdd-mh@nic.in

---

क्र.RDD-76019/16/2025-RDD-(EST-5A) **दिनांक :** ०९ जानेवारी, २०२६.

**प्रति,**

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषदा, सर्व.

**विषय:** सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम गुणांकन संकेतस्थळावर जाहीर करण्याबाबत...

**संदर्भ:** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाचे क्र.एसआरव्ही-२०२५/ प्र.क्र.२७/का.१२ (सेवा), दिनांक ०९ जून, २०२५.
२) शासन शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभागाचे क्र.एसआरव्ही-२०२५/ प्र.क्र.२७/का.१२ (सेवा), दिनांक २० ऑगस्ट, २०२५.
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभागाचे क्र.एसआरव्ही-२०२५/ प्र.क्र.२७/का.१२ (सेवा), दिनांक १६ सप्टेंबर, २०२५.
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभागाचे क्र.एसआरव्ही-२०२५/ प्र.क्र.२७/का.१२ (सेवा), दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५.

**महोदय,**

सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ येथील दिनांक १ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमास १०० दिवसाची मुदतवाढ दिली आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक १६ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमाबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमाच्या अनुषंगाने आपल्या जिल्हा परिषदेचे गुणांकन करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने विहित केलेल्या विवरणपत्रात माहिती प्राप्त झाली. आपल्या जिल्हा परिषदेकडून प्राप्त सदर माहितीच्या

आधारे, ग्राम विकास विभागाकडून आपल्या जिल्हा परिषदेचे गुणांकन व वर्गवारी करण्यात आली असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमाबाबत सदर गुणांकनाची व वर्गवारीची माहिती आपल्या जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर आजच प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(सुभाष इंगळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र: गुणांकन तक्ता.

प्रत,

१. सह सचिव/उप सचिव, सर्व, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. निवड नस्ती, कार्यासन आस्था-५ अ, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.